IIP
IIPIMRJ
International Multidisciplinary Research Journal

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 03 No. Issue II, (April-June) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# अंतोनिओ ग्राम्शीचे जीवन आणि त्याची वैचारिकता : ऐतिहासिक मूल्यमापन

**डॉ. प्रविण बोरकर**

सहयोगी प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग,

आर. के. तलरेजा कॉलेज, उल्हासनगर

**Article Info**

***Article History:***
Received: 07th April 2026
Accepted: 15th April 2026
Published: 17th April 2026

***Keywords:***

*हेजिमनी, मार्क्सवाद, धुरीणत्त्व, प्रभुत्त्व, सेंद्रिय बुद्धिवंत, सांस्कृतिक धुरीणत्त्व. प्रिन्स.*

**ABSTRACT**

अंतोनिओ ग्राम्शी (१८९१-१९३७) विसाव्या शतकातील महत्त्वाचा मार्क्सवादी विचारवंत होता. अल्प आयुष्य लाभलेल्या ग्राम्शीला आयुष्यभर प्रकृतीच्या तक्रारी राहिल्यात, त्याला शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला, आर्थिक विवंचनेमुळे त्याचे पोषण भरण योग्य पद्धतीने झाले नाही. त्याच्या मोठा भावाचा कल समाजवादाकडे असल्याने त्याचा परिणाम ग्राम्शीवर झाला. तुरीन विद्यापीठातील काळ त्याच्या व्यक्तिमत्त्वाला कलाटणी देणारा ठरला. त्याने आपले शिक्षण पूर्ण न करता सक्रीय राजकारणात भाग घेतला. रशियातील साम्यवादी क्रांतीने प्रभावित झालेल्या ग्राम्शीने इटालियन कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करून इटलीत क्रांतीचे स्वप्न बघितले परंतु मुसोलिनीच्या फॅसिस्ट राजवटीमुळे ते पूर्ण होऊ शकले नाही, आपल्या आयुष्याचा बराच काळ त्याला तुरुंगात घालवावा लागला. ग्राम्शीने अकादमिक व राजकीय क्षेत्रात भरीव कामगिरी केली. त्याने मांडलेली हेजिमनीची संकल्पना महत्त्वाची ठरली व त्याचा प्रभाव राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास आणि सांस्कृतिक अभ्यासावर झाला.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: April 15, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Borkar, P. (2026). अंतोनिओ ग्राम्शीचे जीवन आणि त्याची वैचारिकता : ऐतिहासिक मूल्यमापन. *IIP : International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ)*, 3(II), 1–6.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात अकादमिक क्षेत्रात इतिहास विषयात हेजिमनीच्या संकल्पनेला महत्त्व प्राप्त झालेले आहे, ही संकल्पना मांडणारी व्यक्ती म्हणजे अंतोनिओ ग्राम्शी होय. प्रस्तुत संशोधन लेखात ग्राम्शीच्या प्रारंभिक जीवनापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंतच्या महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेण्यात आला आहे, या घटनांचा आढावा घेण्याचे कारण, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली हे समजून घेणे होय. शिक्षणासाठीचा त्याचा संघर्ष, लहानपणापासून त्याला असलेल्या प्रकृतीच्या समस्यांचा त्याच्यावर कसा प्रभाव पडला हे सुद्धा जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. शिवाय अकादमिक क्षेत्रात यशस्वी चाललेली घोडदौड मध्येच थांबवून त्याने सक्रीय राजकारणात जाण्याचा निर्णय का घेतला हे समजून घेतल्याशिवाय ग्राम्शीच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज येत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याच्यावर असलेला मार्क्सवादाचा प्रभाव व त्याने मांडलेल्या संकल्पना व या संकल्पनांचा सामाजिक शास्त्रांवर पडलेला प्रभाव महत्त्वाचा असल्याने ग्राम्शीचे जीवन व त्याच्या वैचारिकतेचा आढावा प्रस्तुत संशोधन लेखातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मुख्य आशय**

**ग्राम्शीचे प्रारंभिक जीवन :**

वर्तमानातील अकादमिक चर्चाविश्वात अंतोनिओ ग्राम्शीच्या विचारांची मोठ्या प्रमाणात चर्चा केली जाते, शिवाय त्याच्या विचारांची दखल सुद्धा घेतली जाते. मार्क्सवादी विचारवंत म्हणून ग्राम्शी परिचित आहेत. ग्राम्शीचा जन्म २२ जानेवारी १८९१ रोजी उत्तर इटलीतील सार्डिनिया बेटावरील 'अलेस' येथे झाला. त्याच्या वडिलाचे नाव 'फ्रांसेस्को ग्राम्शी' होते तर आईचे नाव 'ज्युसेप्पिना मार्काइस' होते. त्यांच्या आई वडिलांना झालेल्या सात अपत्यांपैकी ग्राम्शी चौथे होता. बालपणी ग्राम्शीला प्रकृती अस्वास्थ्य आणि शारीरिक व्यंगांचा त्रास होता. (Fiori, 1970, p. 23) अगदी लहानपणीच एका दुर्दैवी घटनेमुळे ग्राम्शीला कुबड आले होते, त्याची उंचीही कमी राहिली होती त्यामुळे इतर मूले त्याला चिडवत असत, त्याला या गोष्टीची जाणीव होती की, त्याला शारीरिक व्यंग आहे, परंतु ग्राम्शीने या बाबीला स्वतःच्या मनाचा ताबा घेऊ दिले नाही आणि लहानपणापासूनच स्वतःवर नियंत्रण ठेवायची सवय लावून घेतली. आपल्या व्यक्तित्त्वातील या उणीवेची भरपाई त्याने पुस्तकांशी प्रेम आणि अभ्यासात अव्वल राहण्यातून केली. त्याचे वडील सरकारी नोकरीत असल्याने त्याच्या कुटुंबाला काहीसा विशेष दर्जा होता. १८९७ मध्ये ग्राम्शीच्या वडिलांना भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे नोकरी गमवावी लागली व तुरुंगवास झाला. त्याच्या वडिलांच्या तुरुंगवासामुळे कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले. (Hoare & Smith, 1971, p. xiii) अशा परिस्थितीत ग्राम्शीच्या आईने मोठी हिमंत दाखवली, ती 'गिलझारा' या ठिकाणी मुलांसह स्थलांतरित झाली व दिवस रात्र शिवणकाम करून तिने कुटुंबाचे भरणपोषण केले. गिलझारा इथेच १८९८ मध्ये ग्राम्शीच्या प्राथमिक शिक्षणाला सुरुवात झाली, बिकट आर्थिक स्थितीचा परिणाम ग्राम्शीच्या शिक्षणावर सुद्धा झाला.

**ग्राम्शीच्या संघर्षाचा काळ :**

ग्राम्शीचा सर्वात मोठा भाऊ 'जेन्नारो' याचा कल समाजवादाकडे होता, त्याचा मोठा परिणाम अंतोनिओच्या राजकीय विकासावर पडला. ग्राम्शी जेव्हा १९०८ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी कैगलियरी येथे गेला आणि आपल्या मोठ्या भावासोबत राहू लागला तेव्हा त्याला समाजवादी साहित्य मोठ्या प्रमाणात वाचायला मिळाले. त्याने तत्कालीन बुद्धीजीवी असलेल्या 'साल्वेमिनी', 'क्रोचे' इत्यादींचे गांभीर्याने वाचन केले, सोबतच त्याने सार्डिनीयाच्या राजकीय आणि आर्थिक समस्यांवर होणाऱ्या चर्चेतही सहभाग घेतला. त्याचा मोठा भाऊ जेन्नारोची मिळकत, ग्राम्शीचे शिक्षण व दोन्ही भावांचा खर्च भागवण्यासाठी पुरेशी नव्हती, ग्राम्शीचे वडील १९०५ मध्ये तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांनी काम करायला सुरुवात केली होती, परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वीसारखी होऊ शकली नाही, त्यामुळे वयाच्या अकराव्या वर्षी त्यालाही काम करावे लागले. (ग्राम्शी, २०२०, पृ. १०) ग्राम्शीने कमी पैशात खर्च भागवण्यासाठी सकाळची कॉफी पिणे सोडून दिले तसेच तो एकदाच जेवण करू लागला, त्यामुळे तो कुपोषणाचा शिकार झाला. असे असले तरी ग्राम्शी निराश झाला नाही, त्याने त्याचे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. त्याच्यासाठी हा काळ एकप्रकारे संधीकाळ होता, त्यांनी वयाची १६ वर्षे पूर्ण केली होती, परंतु त्याची प्रकृती ही त्याच्यासाठी एक मोठी समस्या होती, त्यावर मात करत तो पुढे जाण्याचा प्रयत्न करत होता.

**तुरीन विद्यापीठातील दिवस :**

१९११ चा काळ हा ग्राम्शीसाठी कलाटणी देणारा काळ होता, त्याने पुढील शिक्षणासाठी इटलीतील तुरीन विद्यापीठात अर्ज केला आणि या विद्यापीठाची शिष्यवृत्ती त्याला मिळाली. तो शिष्यवृत्तीवर तुरीनला गेला, जिथे त्याला औद्योगिक कामगार वर्गाच्या जीवनाचा अनुभव आला. (Clark, 1977, p. 45) तुरीनची शिष्यवृत्ती फार जास्त नव्हती, या विद्यापीठात त्याने 'फॅकल्टी ऑफ लेटर्स' या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमात साहित्यासह तत्त्वज्ञान, धर्म, भाषा, कला इत्यादी विषयांचा अंतर्भाव होता. ग्राम्शी लवकरच भाषेचे प्राध्यापक 'मैत्तियो बार्तोली' आणि साहित्याचे प्राध्यापक 'अंबर्तो कॉस्मो' यांचा आवडता विद्यार्थी झाला. प्राध्यापक बार्तोली यांना ग्राम्शी कडून मोठ्या अपेक्षा होत्या, त्यांचा हा विद्यार्थी भाषा विज्ञान क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देईल, असे त्यांना वाटत होते. कॉस्मो यांनी ग्राम्शी मध्ये साहित्याची रुची निर्माण करण्यात मदद केली. प्राध्यापक 'पाश्तोरे' यांनी त्याला तत्त्वज्ञान आणि मार्क्सवाद शिकवला. विद्यापीठातील काळात समाजवादी विचारांशी झालेल्या संपर्काने त्याच्या राजकीय विचारसरणीला आकार दिला. (Hoare & Smith, 1971, p. xiv) तुरीन विद्यापीठात असतानाच त्याचा संबंध इटालियन समाजवादी पक्षाशी आला. एकीकडे दिवसेंदिवस बिघडत चाललेली प्रकृती, अत्यंत हलाखीची परिस्थिती तर दुसरीकडे शिष्यवृत्ती टिकवून ठेवण्यासाठी अहोरात्र करावा लागणारा अभ्यास या सर्वांचा मोठा परिणाम ग्राम्शीवर झाला. याही परिस्थितीत त्याने सामाजिक शास्त्रांसह भाषाविज्ञानाच्या विविध शाखांमध्ये विशेष प्राविण्य मिळवले. १९१३ मध्ये त्याने इटालियन समाजवादी पक्षामध्ये प्रवेश केला व १९१५ मध्ये अकादामिक विश्वातील फुलत चाललेली कारकीर्द संपवत त्याने सक्रीय राजकारणात भाग घेतला. त्याच्या या निर्णयामागे फक्त आर्थिक विवंचना आणि प्रकृतीच्या तक्रारी हे कारण नव्हते, कारण याची त्याला आता सवय झालेली होती, खरेतर या वर्षांमध्ये त्याला अकादमिक विश्व सामाजिक जीवनातील वास्तविकतेपासून दूर गेलेला वाटला. ग्राम्शीला त्याचे विचार मूर्त स्वरुपात प्रत्यक्षात उतरवायचे होते, त्यातच तुरीन शहरात आंदोलनाचे वातावरण त्याला आकर्षित करत होते, त्यामुळे कुठल्याही एकाच कारणाने ग्राम्शीने अकादमिक क्षेत्राचा निरोप घेण्याचा मोठा निर्णय घेतला असे नाही तर त्यामागे विविध घटक होते हे लक्षात येते.

**ग्राम्शीचा राजकारणातील प्रवेश :**

अकादमिक क्षेत्र सोडल्यावर ग्राम्शीने 'इल ग्रिदो', 'देल पॉपोलो' व 'अवंती' यासारख्या महत्त्वाच्या वृत्तपत्रांमध्ये लिखाण करायला सुरुवात केली. तुरीन शहरात त्याला रंगमंचाच्या संबंधित समीक्षा, राजकीय लेख, मार्क्स आणि फ्रेंच क्रांतीवरील व्याखानांमधून प्रसिद्धी मिळू लागली. १९१७ मध्ये रशियन क्रांती झाली आणि ग्राम्शीला इल ग्रिदोचे संपादक बनवण्यात आले. यासोबतच त्याला इटालियन समाजवादी पक्षाच्या तुरीन शहर शाखेच्या कार्यकारिणी समितीचे सदस्यही बनविण्यात आले. ग्राम्शीवर रशियन क्रांतीचा मोठा प्रभाव पडला होता, त्याने इटलीत सुद्धा क्रांतीच्या शक्यता तपासायला सुरुवात केली. १९१९ मध्ये त्याने त्याचे मित्र 'तास्का', 'तेरासिनी' आणि 'तौग्लियात्ती' यांच्यासह 'द न्यू ऑर्डर' नामक समाजवादी संस्कृतीचे परीक्षण करणारे साप्ताहिक सुरु केले. या आपल्या नव्या साप्ताहिकाच्या माध्यमातून इटालियन क्रांतीसाठी सिद्धांत विकसित करायला त्याने सुरुवात केली. त्याने समाजवादी पक्षाच्या विविध गटांना एकत्र येण्याचे आवाहनही केले. १९२० मध्ये इटलीत कामगारांचा सर्वात मोठा संप झाला, कामगारांनी कारखान्यांवर ताबा मिळवला, ग्राम्शी आणि त्याच्या सहकाऱ्यांचा यात मोठा सहभाग होता, परंतु समाजवादी पक्षाने या संपाप्रती निश्चित भूमिका न घेतल्याने कामगारांना संप मागे घ्यावा लागला. याचा मोठा परिणाम ग्राम्शी आणि त्याच्या सहकाऱ्यांवर झाला व त्यांनी वेगळा पक्ष बनविण्याचा विचार केला, १९२१ मध्ये इटालियन कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेत त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. (Fiori, 1970, p. 112) १९२२ ते १९२४ या काळात ग्राम्शी कम्युनिस्ट पक्षाचा प्रतिनिधी म्हणून मास्को आणि व्हियन्ना मध्ये वास्तव्यास होता. तो मास्कोला कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीला हजर राहण्यासाठी गेलेला असतांना त्यांची भेट 'ज्युलिया' नामक महिलेशी झाली, भेटीचे रुपांतर प्रेमात झाले व त्या दोघांनी पुढे विवाह केला. प्रेमामुळे आणि विवाहामुळे त्याच्या निरस आयुष्यात एकप्रकारे सजीवता आली.

**फॅसिस्ट सत्ता आणि कम्युनिस्टांवरील संकट :**

इटलीत इकडे फॅसिस्टांनी रोमकडे आपला मोर्चा वळवला आणि सत्ता काबीज केली. मुसोलिनी सत्तेवर आरूढ झाला. इटलीत फॅसिस्टांची हुकुमशाही येऊ शकते अशी आशंका ग्राम्शीने आधीच व्यक्त केली होती. इटालियन समाजवादी पक्ष आणि

साम्यवादी पक्षाने एकत्र यावेत यासाठीही प्रयत्न करण्यात आलेत, परंतु ते वास्तवात आले नाही, मुसोलिनी हुकुमशहा बनल्यानंतर त्याने या दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांची धरपकड केल्याने या दोन्ही पक्षाच्या एकत्र येण्याची शक्यताही मावळली. या घटना घडत असतांना ग्राम्शी मास्कोत होता, तिकडे इटलीत कम्युनिस्टांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले, ग्राम्शीला सुद्धा पकडण्याचे आदेश देण्यात आले परंतु १९२४ मध्ये तो संसद सदस्य म्हणून निवडून आला असल्याने त्याला पकडणे शक्य नव्हते. दोन वर्षानंतर तो इटलीत आला आणि रोममध्ये एक घर भाड्याने घेऊन राहू लागला. १६ मे १९२५ रोजी ग्राम्शीने संसदेत गुप्त संघटनांवर बंदी घालण्याच्या आशयावरील विधेयकाची आलोचना करणारे भाषण दिले. पोलिसांचे बारीक लक्ष त्याच्यावर होते, ८ नोव्हेंबर रोजी ग्राम्शीसह इतर कम्युनिस्ट संसद सदस्यांना विशेष आदेश काढून अटक करण्यात आली. संसदेच्या नियमानुसार संसद सदस्यांना अटक करता येत नव्हती, असे असतानाही त्याला अटक करण्यात आली. ग्राम्शीला रोममधील रेगिना कोयली तुरुंगात ठेवण्यात आले. १८ नोव्हेंबर रोजी त्याला नविन राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार पाच वर्षाच्या नजरकैदेची शिक्षा देण्यात आली, त्याला उस्तिका बेटावर पाठवण्यात आले, तिथेही ग्राम्शी शांत बसला नाही, त्याने तिथेही कम्युनिस्ट आणि समाजवादी मित्रांसोबत कैद्यांना शिकवण्यासाठी शाळा सुरु केली. ग्राम्शीला नजरकैदेत ठेऊन इटलीतील फॅसिस्ट सत्तेचे मन भरले नाही त्यामुळे १९२७ मध्ये मिलन येथील मिलिट्री न्यायालयाने ग्राम्शीच्या अटकेचे वारंट जारी केले, त्याला पकडून न्यायाधीशांच्या पुढे हजर करण्यात आले, त्याला मिलनमधील सेन वित्तोर तुरुंगात ठेवण्यात आले.

**ग्राम्शीचा तुरुंगवास व आयुष्याचा शेवट :**

ग्राम्शीवर वर्ग द्वेष आणि गृह युद्धाचे वातावरण तयार करण्याचा आरोप करण्यात आला व त्याला २० वर्षे ४ महिने व ५ दिवसांची शिक्षा देण्यात आली, सरकारी वकिलाने युक्तिवाद केला की, या माणसाचा मेंदू किमान २० वर्षासाठी बंद राहील, अशी व्यवस्था केली पाहिजे. (Fiori, 1970, p. 207) ग्राम्शीच्या नाजूक प्रकृतीला लक्षात घेऊन त्याला बारीजवळील तुरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. त्याला १५ दिवसाच्या अंतराने पत्र लिहिण्याची परवानगी देण्यात आली. १९२९ मध्ये ग्राम्शीला अभ्यास आणि लेखनासाठी मंजुरी देण्यात आली. लेखन करतांना त्याला भाषेबाबत सावध राहावे लागत असे कारण, यावरून त्याच्या अभ्यास व लेखनावर बंदी आणली जाऊ शकत होती. १९२९ मध्येच त्याने पहिल्या नोटबुक मध्ये मुख्य विषयांची सूची तयार करून लिहायला सुरुवात केली. सोबतच ग्राम्शीने पक्षात बुद्धीजीवींची भूमिका, पक्षाचे मिलिट्रीशी संबंध, संविधान सभेची निर्मिती इत्यादी विषयांवर सोबत असलेल्या कैद्यांसोबत चर्चाही केली. याच काळात त्याच्या प्रकृतीच्या तक्रारी वाढतच गेल्या, तुरुंगात आल्यानंतर त्याला झोप येणे बंद झाले होते, त्याचा परिणाम त्याच्या मानसिक शांतता आणि एकाग्रतेवर झाला. या परिस्थितीत डॉक्टरकडून त्याच्या तपासणीची मागणी सरकारकडून मान्य करण्यात आली, डॉ. आर्केजेली यांनी तपासाअंती सांगितले की, या परिस्थितीत ग्राम्शी अधिक काळ जिवंत राहू शकणार नाही. त्यांनी ग्राम्शीला उपचारासाठी दवाखान्यात भरती करण्याचा सल्ला दिला. सरतेशेवटी १९३३ मध्ये ग्राम्शीला उपचारासाठी फोरमियातील एका क्लिनिकमध्ये पाठवण्यात आले, परंतु त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही, प्रकृती अस्वास्थ्यामुळे ग्राम्शीला त्याच्या मृत्यूपूर्वी काही काळ आधी तुरुंगातून सोडण्यात आले. (Clark, 1977, p. 312) १९३५ मध्ये त्याची प्रकृती खूप बिघडल्याने त्याला रोममधील क्लिनिक मध्ये दाखल करण्यात आले. २५ एप्रिल १९३७ रोजी त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाला आणि दोन दिवसानंतर २७ एप्रिल १९३७ रोजी त्याने कायमचा जगाचा निरोप घेतला. (Fiori, 1970, p. 243)

**ग्राम्शीची वैचारिकता :**

**क्रोचे आणि मार्क्सचा प्रभाव :**

ग्राम्शीच्या विचारांना समजून घेण्यासाठी इटली आणि युरोपमधील बौद्धिक वातावरणाला लक्षात घ्यावे लागते. पहिल्या महायुद्धाच्या पूर्वी बेनेदित्तो क्रोचेच्या विचारांनी इटलीतील बुद्धीजीवींसाठी संजीवनीचे काम केले होते. मार्क्ससाठी ज्याप्रमाणे हेगेलचे विचार महत्त्वाचे होते त्याचप्रमाणे ग्राम्शीसाठी क्रोचेचे विचार महत्त्वाचे होते. ग्राम्शीवर आदर्शवादी विचारवंत क्रोचेचा मोठा प्रभाव होता. (Forgacs, 2000, p. 56) ग्राम्शीचे विचारविश्व त्याच्या लेखनातून आपणास कळते. त्यासाठी त्याच्या तुरुंगातील लेखनाचा म्हणजेच 'प्रिझन नोटबुक्स'चा आधार घेतला जातो, शिवाय त्याने तुरुंगात असताना लिहिलेली पत्रे आणि टिपणे यातून त्याचा विचार अभ्यासता येतो. तुरुंगातील त्याचे लेखन १९४७ नंतर प्रसिद्ध झाले. तुरीन विद्यापीठात शिकत असताना

त्याने कार्ल मार्क्सचे लेखनही त्याने वाचले होते. मार्क्सची पाया, इमला ही रचना प्रसिद्ध आहे, धर्म, संस्कृती, राजकारण इत्यादी बाबींचा समावेश इमल्यामध्ये होतो. पायातील बदल्यानुसार इमल्यात बदल होतो असे मार्क्सचे मत होते. परंतु उत्पादन आणि उत्पादनाच्या संबंधांमध्ये बदल झाला असून, कारखान्याच्या क्षेत्राचा विचार करून केलेली मार्क्सची मांडणी अपुरी आहे असे ग्राम्शीला वाटत होते, सांस्कृतिक आयामांकडे मार्क्सने पुरेसे लक्ष दिलेले नाही, अशी टीका ग्राम्शीच्या मांडणीतून दिसून येते.

**नागरी समाज व पाया इमला रचना :**

ग्राम्शीच्या विचारात नागरी समाजाच्या भूमिकेला महत्त्व आहे. पाया-इमला रचनेत इमल्यात नागरी समाजाचा समावेश होतो. ग्राम्शी नागरी समाजाच्या व्यापक अवकाशासह इमल्याचे मूल्यांकन करतो. ग्राम्शीच्या नागरी समाज संज्ञेत विधी संघटना, सांस्कृतिक संघटना ते दैनंदिन जगण्याचे विविध आयाम इत्यादीचा समावेश होतो. या संज्ञेचा थेट संबंध कॉमन सेन्सशी आहे. ग्राम्शीच्या मते, “सर्वसाधारण ज्ञान हे काही ताठर आणि अमूर्त बाब नाही, तर ते स्वतःमध्ये सतत परिवर्तन घडवत असते.” (Gramsci, 1971, p. 326) नागरी समाज स्थानयुद्धासाठी भूमी तयार करण्यात मोलाची भूमिका बजावतो. धुरीणत्त्वाची संकल्पना ही ग्राम्शीच्या महत्त्वपूर्ण विचारांपैकी एक आहे. ग्राम्शीपूर्वी व्लादिमिर लेनिन यांनी ‘धुरीणत्व’ या संज्ञेचा वापर केला होता. लेनिनच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन ग्राम्शीने धुरीणतत्त्वाच्या संकल्पनेला स्वतःचा अर्थ दिला. रशियाप्रमाणे इटलीत क्रांती झाली नाही, याची कारणमीमांसा ग्राम्शीने केली आहे. रशियन क्रांतीचा अन्वयार्थ लावतांना धुरीणत्त्वाच्या आधारे विश्लेषण केले. भांडवलशाही आणि बूझ्वा राज्यसंस्थेच्या विरोधात लढण्यासाठी कामगारवर्गाला विविध समाजगटांसोबत आघाडी करून पुढे जाण्याची आवश्यकता त्याने प्रतिपादित केली होती. ग्राम्शीच्या धुरीणतत्त्वाच्या लेखनातून त्याचे ऐतिहासिक आणि राजकीय विश्लेषण लक्षात येते.

**प्रिन्स व धुरीणत्त्व :**

प्रिझन नोटबुक्स या आपल्या पुस्तकात ग्राम्शीने ‘निकोलो मॅकियाव्हली’ या विचारवंताच्या ‘प्रिन्स’ या संकल्पनेच्या आधारे राजकीय कृती कार्यक्रम कसा असावा, या संदर्भात मार्गदर्शक प्रस्ताव मांडला आहे. ग्राम्शी मॅकियाव्हलीच्या ‘प्रिन्स’चा अन्वयार्थ लावताना ‘राजा’ हे सामुहिक शक्तीचे प्रतिक म्हणून पाहतो. त्यामुळेच ग्राम्शीच्या मते, कम्युनिस्ट पक्ष हाच आधुनिक प्रिन्स आहे. नवे समाजवादी राज्य स्थापन करण्यासाठी पक्षाने राजकीय प्रक्रियेवर कामगार वर्गाचे धुरीणतत्त्व स्थापन केले पाहिजे. लोकशाही समाजवाद निर्माण होण्याकरिता कम्युनिस्ट पक्षाची भूमिका महत्त्वाची व निर्णायक असायला हवी. ग्राम्शीच्या मते धुरीणत्त्व किंवा प्रभुत्त्व हे दोन पद्धतीने प्राप्त करता येते. बळाच्या आणी संमतीच्या आधारावर ते प्राप्त करता येते. (Gramsci, 1971, p. 57) एखाद्या सामाजिक गटाचे वर्चस्व ग्राम्शी संमतीच्या आधारे निर्माण होणाऱ्या धुरीणत्त्वाच्या अनुषंगाने मांडणी करताना, कामगार वर्गाने वैचारिक प्रभूत्त्वाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे असे सांगतो. ग्राम्शीने संमतीवर अधिक भर दिला असला तरी बळाचा वापर करण्याला पूर्णपणे नकार दिलेला नाही. भांडवलशाहीच्या प्रभुत्त्वाला विरोध करून नव्या समाज रचनेची अपेक्षा येथे केली गेली आहे.

**सांस्कृतिक धुरीणत्त्व :**

सांस्कृतिक धुरीणत्त्व ही अतिशय महत्त्वाची संकल्पना ग्राम्शीच्या विचारातून समोर येते. समाजातील सत्ताधारी वर्गाच्या धारणा इतर समाज स्वीकारतो. सत्ताधारी वर्गाचे राहणीमान, खानपान, भाषा, शैली इत्यादी बाबींचे अनुकरण इतर समाज करू लागतो. त्यामुळे धुरीणतत्त्वाच्या प्रक्रियेला उत्तर देताना ग्राम्शी प्रतिधुरीणत्त्वाची कल्पना मांडतात. कामगार वर्गातून प्रतिधुरीणत्त्व निर्माण व्हावे, अशी त्यांची अपेक्षा आहे. ग्राम्शी प्रणित धुरीणत्त्व अधिक प्रमाणात संमतीवर आधारलेले आहे. ग्राम्शीच्या मते, वर्चस्व हे जनसामान्यांच्या ‘स्वयंभू संमतीवर’ आधारित असते. (Gramsci, 1971, p. 12) संमती निर्माण करण्याचे काम नागरी समाजाचे आहे तर बळाच्या आधारे धुरीणत्त्व राजकीय समाज निर्माण करतो असे ग्राम्शीने म्हटले आहे. बुद्धिवंतांनी नैतिक, तात्त्विक, वैचारिक आणि वैज्ञानिक मूल्यांच्या आधारे धुरीणत्त्व प्रकल्पातून समाजमानस घडवणे अपेक्षित आहे. त्यासाठी बुद्धिवंतांनी कोणत्या प्रकारची भूमिका पार पाडली पाहिजे. तसेच पारंपारिक विचारवंत आणी सेंद्रिय विचारवंत यातील फरकही ग्राम्शीने स्पष्ट केला आहे.

**सेंद्रिय बुद्धिवंत :**

बुद्धिवंतांबाबत मांडणी करत असताना ग्राम्शी, "सर्वच माणसे बुद्धिजीवी असतात, पण समाजात सर्वच माणसे बुद्धिजीवींची भूमिका बजावत नाहीत." असे भाष्य केले आहे. (Gramsci, 1971, p. 9) याचा अर्थ शारीरिक कष्टाचे काम करणारी व्यक्तीही विद्यापीठीय अकादमिक व्यक्तीइतकीच सर्जनशील आणि बुद्धिवंत असते, परंतु इतर शारीरिक व कष्टाच्या कामात गुंतल्यामुळे पारंपारिक अर्थाने बुद्धीवंताचे काम पार पडणारे लोक मोजकेच असतात. क्रांतिकारी समाजवादासाठी कामगार वर्ग आणि बुद्धिवंत यांच्यातील दरी ही समस्या सातत्याने भेडसावते. बुद्धिवंत, शेतकरी आणि कामगार यांना जोडण्याची कल्पना ग्राम्शीने लेनिनकडून स्वीकारली मात्र या वर्गांची आघाडी दीर्घकाळ टिकून रहावी म्हणून कामगार वर्गाला स्वताच्या समूहातून स्वतःसाठीचे बुद्धीवंत घडवावे लागतील. या बुद्धीवंतांना ग्राम्शी 'सेंद्रिय बुद्धिवंत' असे संबोधतात. सेंद्रिय बुद्धिवंत हे केवळ सैद्धांतिक मांडणी करणार नाहीत तर प्रत्यक्ष तळागळात जाऊन काम करतील. व्यावहारिक कौशल्ये, तांत्रिक कौशल्ये सेंद्रिय बुद्धिवंतांस अवगत असतील. कामगार वर्गासोबत त्या व्यक्तीची जैविक नाळ जोडली गेलेली असेल. ग्राम्शीच्या मते, "नव्या बुद्धिजीवीचे अस्तित्त्व यापुढे वक्तृत्वात असू शकत नाही... तर ते व्यावहारिक जीवनातील सक्रिय सहभागात असले पाहिजे." (Gramsci, 1971, p. 10)

ग्राम्शीचे विचार महत्त्वाचे आहेत एक नव्या पद्धतीची समाजरचना निर्माण करण्यासाठी ग्राम्शी महत्त्वाचे वैचारिक खाद्य आपणास पुरवतो. ग्राम्शीवर धुरीणतत्त्वाच्या संकल्पनेवरून टीकाही केली जाते, शिवाय त्याने इटलीच्या संदर्भातच विचार मांडले आहेत असेही म्हटले जाते, असे असले तरी तत्त्कालीन इटलीतील एकंदर परिस्थिती बघता ग्राम्शीने मांडलेले विचार त्यानंतरच्या पिढ्यांनाही दिशादर्शक ठरले.

**निष्कर्ष :**

अंतोनिओ ग्राम्शीचे जीवन आणि त्याचे विचार आधुनिक काळाच्या संदर्भात महत्त्वाचे ठरतात. ग्राम्शीचे जीवन प्रेरणादायी आहे, त्याला त्याच्या जीवनात ज्यापद्धतीचा संघर्ष करावा लागला, ज्या संकटांचा सामना करावा लागला, तुरुंगवास भोगावा लागला व प्रकृतीच्या तक्रारीसह जीवन जगावे लागले हे सर्व सोपे नव्हते, त्यासाठी खंबीरपणाची गरज होती, ते खंबीरपण ग्राम्शीकडे होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा, सभोवतालच्या परिस्थितीचा प्रभाव त्याच्या विचारांवर पडला, रशियन क्रांतीपासून प्रेरणा घेत त्यांने इटलीत क्रांतीचे स्वप्न बघितले पण मुसोलिनीच्या राजवटीमुळे ते शक्य होऊ शकले नाही. ग्राम्शीने भविष्यातील पायाभरणीच्या दृष्टीने जे सिद्धांतन केले ते जागतिक स्तरावर मोलाचे ठरले, त्याने मांडलेली धुरीणत्त्वाची संकल्पना, प्रभूत्त्वाची संकल्पना, सांस्कृतिक धुरीणत्त्व व सेंद्रिय बुद्धिवंताची संकल्पना ही आधुनिक जगाला दिलेली वैचारिक देणगी आहे.

**संदर्भ :**

1. Clark, M. (1977). *Antonio Gramsci and the Revolution That Failed.* Yale University Press.
2. Fiori, G. (1970). *Antonio Gramsci: Life of a Revolutionary.* New Left Books.
3. Forgacs, D. (2000). *The Gramsci Reader: Selected Writings 1916–1935.* NYU Press.
4. Gramsci, A. (1971). *Selections from the Prison Notebooks.* Edited & translated by Quintin Hoare & Geoffrey Nowell Smith. New York: International Publishers.
5. Hoare, Q., & Smith, G. N. (1971). *Selections from the Prison Notebooks of Antonio Gramsci.* Lawrence & Wishart.
6. ग्राम्शी, अन्तोनियो. (२०२०). *साहित्य, संस्कृति और विचारधारा.* अनुवाद और सम्पादन रामनिहाल गुंजन. गार्गी प्रकाशन.